2019 - 2020

(32)

25M

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - IV October - December - 2019

PART - IV

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani, Dist. Bhandara
Ref. No.

Scanned with CamScanner

# १०. डॉ. योगेन्द्र मेश्रमांचे मराठी साहित्यातील योगदान

**प्रा. चंद्रशेखर सुधाकर देवघरे**
स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी, जि. भंडारा.

साहित्य म्हणजे साहित्यिकाच्या संवेदनशील मनाचा अविष्कार असतो. या आविष्कारातून साकार होणारी साहित्यकृती स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व जपणारी असते. साहित्याचे अनेक प्रकार असून त्यात प्रामुख्याने दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, लोकसाहित्य, ग्रामीण साहित्य, प्रादेशिक साहित्य, तौलानिक साहित्य असे विविध प्रकार पाहायला मिळतात. त्यातल्या त्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक हे प्रमुख वाङ्मय प्रकार सर्वच साहित्यात आढळतात. तेव्हा त्या–त्या लेखकांचा किंवा कवींचा त्यांच्या सर्व वाङ्मय प्रकाराच्या लिखाणातून, त्यांच्या संवेदनशील मनाचा कलात्मकदृष्टया अविष्कार होतो. साहित्यकृतीच्या अंगाने पाहता साहित्यिकांना आलेले अनुभव, त्यांना मिळालेली प्रेरणा, त्यांची भूमिका, त्यांची जडणघडण, लिखाणाची शक्ति जी आपल्यासमोर प्रगट होतांना दिसते आणि त्यातूनच साहित्यिकाचे व्यक्तिमत्व हे खुलत जाते. काही प्रसंग व घटनांची नोंद आपण त्यांच्या कविता वा लेखनाच्या माध्यमातून (साहित्यातून) घेत असतो. त्यामुळे आस्वाद आणि आकलनाची गोडीही वाढत जाते व तिचे योग्य तसे मुल्यमापन ही करायला लागतो. तेव्हा आपण कथा या वाङ्मयप्रकाराचा अभ्यास करतांना आपल्याला दलित साहित्य चळवळीतील एक सुप्रसिध्द कथा लेखक डॉ. योगेन्द्र मेश्राम यांचा परिचय करुन घेणे महत्वाचे ठरेल.

**डॉ. योगेन्द्र मेश्राम यांचा संपूर्ण परिचय**

मराठी साहित्यात कथेच्या क्षेत्रात अनेक लेखकांनी अत्यंत मोलाची भर पाडलेली आहे. त्यापैकी विदर्भातील ज्येष्ठ कथाकार म्हणून डॉ. योगेन्द्र मेश्राम हे नाव दलित साहित्यांच्या निर्मितीच्या प्रदेशात अटळ असे आहे. कथेच्या क्षेत्रात समृध्द अशी वाटचाल करणाऱ्या डॉ. योगेन्द्र मेश्राम यांनी समीक्षेच्या आणि संपादनाच्या क्षेत्रात ही आपला ठसा उमटविलेला आहे. दलित साहित्यांचे व दलित साहित्य चळवळीचे ते भाष्यकार आहेत. दलित साहित्याचा मुल्य विचार करतांना त्यांची भूमिका विवेकनिष्ठ व तर्कशुध्द आहे. एकांगी व अभिनिवेशी असा दृष्टिकोण न स्विकारणारे डॉ. मेश्राम आजच्या दलित समिक्षकांत स्वतःचे स्वतंत्र असे स्थान राखून आहेत.

डॉ. योगेन्द्र लक्ष्मणराव मेश्राम हे दलित, बौध्द समाजातून पुढे आलेले. खेडयात (चंद्रपूर/गडचिरोली) चा जन्म लहाणपणापासून अस्पृश्यतेचे चटके, दारिद्रयाचा बिकट अनुभव, विद्यार्थी दशेपासून आंबेडकरी चळचळीचे वादळवारे प्यालेल मन. आरमोरी या गावी शिक्षक असतांना खेडोपाडी प्रचार–प्रबोनार्थ सभा मिटींगा, स्वरचित नाटय–एकांकिका, गीतांच्या व्दारे समाज जागृतींचा त्यांचा प्रयत्न, संगीत, गाण्यांची त्यांना विशेष आवड. चित्रकलेचा व कविता रचण्याचाही छंद त्यांनी जोपासला आहे.

यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे मराठीचे वरिष्ठ अधिव्याख्याता (प्राध्यापक) म्हणून कार्य केले. जाणे–येणे, धावपळ, दगदग कायम. मधल्या काळात सरकारी नोकरीत भटकंती, या रखरखत्या प्रवासातच



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara

एम.ए.पी. एच.डी. निर्मितीकडे अगोदरच ओढ वाढलेली. मुंबईत सत्तर—बहात्तरात नेरुरकर — बागुल — ढसाळ — पवारांच्या सहवासात तुरळक कविता. बाबुराव बागुलांच्या कथेचा विशेष प्रभाव. पुढे—पुढे कादंबरी—वैचारिक—समीक्षापर असे लेखन.साहित्यिक—सामाजिक चळवळीत विशेष सहभाग. सभा—संमेलने—मेळावा—परिसंवादात सहभाग. महाराष्ट्र राज्य—साहित्य संमेलन मंडळ पुरस्कृत—लोकानुकम्पा (त्रैमासिक) व्दारे समाजप्रबोधनाचे कार्य मानवतावादी, बुध्दि प्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण, आंबेडकरवादी भूमिका दु:ख मुक्त, शोषमुक्त अशा नव्या मानवसमाज निर्मितीची प्रेरणा देणारी आकांक्षा बाळगणारी समाज प्रबोधनाची त्यांची वाड्मय निर्मीती आहे.

डॉ. गंगाधर पानतावणे आपल्या (द.सा.उद्गम व विकास) च्या प्रस्तावनेत म्हणतात त्याप्रमाणे डॉ. योगेन्द्र मेश्रामांनी नव्या मानव संस्कृतीचा नवनिर्माणक्षम असा कांतीदर्शी अविष्कार म्हणजे दलित वाड्मय, असे सांगून दलित वाड्मय हे मानवतेच्या विश्वात्मक बैठकीवर उभे असलेले विद्रोही स्वरुपाचे व लढावू प्रवृत्तीचे तसेच सृजनशील अंत:करणाचे वाड्मय आहे. असा स्वच्छ निर्वाळा त्यांनी दिलेला आहे. अर्थात डॉ. योगेन्द्र मेश्रामांच्या वाड्मयात प्रामुख्याने, मानवता, सृजनशीलता, तर्कशुध्दता वास्तविकता, सत्यान्वेशी दृष्टिकोण, प्रखर व आकमक भाषा, वेदना व विद्रोह, अंतर्मुखी करणारे निर्मीतीमन, विवेचनातील समतोलपणा या सर्व गोष्टी दिसून येतात. डॉ. मेश्रामांच्या ठायी एक सच्चा आंबेडकरवादी लेखक जो सर्व गुणांनी युक्त आहे असेच त्यांचे समीक्षात्मक व वैचारिक लेखन जे सर्वांगिण दृष्टया नवी सामाजिक व वाड्मयीन जाणीव निर्माण केल्याखेरीज राहू शकत नाही. स्वत:ला भिजू न देणाऱ्या फक्त काठावर उभे राहून निरिक्षण करणाऱ्या काही दलित समीक्षकांप्रमाणे त्यांची भूमिका मात्र दिसत नाही तर त्यांचा शोधग्रंथ म्हणजे दलित साहित्यावरील (काव्य, कथा, कादंबरी, नाटय, आत्मचरित्र इ. सर्व प्रकारांचा मुल्यवेध घेणारा व एकूण निष्कर्षचर्चा भाष्य मांडणारा) एक सर्वांगिण चिकित्सक अभ्यास आहे. तर डॉ. अविनाश देशपांडे या संदर्भात म्हणतात की, दलित साहित्याचा सर्वांगिण अभ्यास आणि त्याचा चिकित्सक दृष्टिने मुलभूत विचार मांडतांना लेखक केवळ वाड्मयीन दृष्टयाच वेध घेत नाही, तर दलित साहित्य ही एक सामाजिक घटना आहे. हे सांगतांना नव्या सामाजिक जाणीवा व नव्या वाड्मयीन प्रवृत्तींची नव्या दृष्टिकोणाची व उद्दीष्टांची आणि नव्या सांस्कृतिक—सामाजिक संकल्पनांची तसेच सामाजिक बांधिलकीची डॉ. मेश्रामांनी केलेली मुलभूत अशी साक्षेपी चर्चा अतिशय मौलिक आहे. या सर्व चर्चेतून त्यांनी सिध्दविलेले दलित साहित्याचे वेगळेपणा, त्यांचे मराठी साहित्यातील वेगळे वैशिष्टय आपल्या लक्षात भरल्यावाचून राहत नाही. याप्रमाणे डॉ. योगेन्द्र मेश्रामांच्या वाड्मयातील अनेक महत्वपूर्ण पैलू आपण पाहिले तेव्हा त्यांची प्रबोधनवादी वाड्मयीन जडणघडण कशी झाली हे पाहणे इष्ट ठरेल.

**डॉ. योगेन्द्र मेश्रामांची साहित्यनिर्मिती**

डॉ. योगेन्द्र मेश्राम हे कथाकार म्हणून सर्वत्र परिचित असले तरी, समीक्षा, विचारिक निबंध, कांदबरी इत्यादी साहित्यात त्याचप्रमाणे संपादकीय क्षेत्रात त्यांची भूमिका मोलाची आहे. १९८६ पासून 'मुखपत्र' 'लोकानुकम्पा', (त्रैमासिक) चे संपादक राहिले. त्याचप्रमाणे 'प्रवुध्द चेतना मंडळ' नागपूर चे अध्यक्ष राहिले तसेच १९४९ डॉ. आंबेडकर फेलोशिप द्वारा प्राप्त 'दलित साहित्य अकादमी' च्या मराठी सल्लागार समितीचे सदस्य ही ते राहिले आहे, 'डॉ. आंबेडकर प्रोफेसर्स असोशिएशन' चे सदस्य ही ते राहिलेले आहेत. डॉ.



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N. P. W. College, Lakhani Dist. Bhandara
Ref No.
Dt.
Scanned with CamScanner

मेश्राम हे प्रमुख कथाकार, कादंबरीकार, समिक्षक, साक्षेपी संपादक, आणि सामाजिक चळवळीत सहभाग देणारे नि:स्पृहाचिंतक असे त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. अर्थात. त्यांचा मुळपिंड हा ललित लेखकाचाच आहे. आहे. आजच्या दृक श्राव्य माध्यमाच्या काळात तर मेश्रामांच्या कथांना एक विशेष महत्व आहे, विशेषत: त्यांच्या कथांच्या लेखणात इतका जीवंतपणा आहे, जो त्यांच्या पात्रांद्वारे आक्रोश व आव्हान करतांना दिसतो. तेव्हा आपण अशा या बहुआयामी व्यक्तिमत्वाच्या सर्व वाङ्‌मय सृष्टीचा थोडक्यात आढावा घेऊ.

**ललित**

१. ' रक्ताळलेली लक्तरे (कथासंग्रह), विजयप्रकाशन, नागपूर, १९८१ (महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त)
२. जगण्याचा प्रश्न (कथासंग्रह), प्रचार प्रकाशन, कोल्हापूर १९८९.
३. हाहा:कार (दीर्घकथा)य कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९४९. (१९९६ चा अस्मिादर्श पुरस्कार प्राप्त)
४. माहां गाव कुठाय? (कादंबरी), कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९८८.
५. झाकली झोल (कांदबरी), पारमिता प्रकाशन, नागपूर, १९९०.

**वैचारिक / समीक्षापर**

१. दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते— प्रचार प्रकाशन. कौल्हापूर, १९८७.
२. सामाजिक मुल्य संघर्षाचा इतिहास— विश्व भारती प्रकाशन, नागपूर, १९९८.
३. दलित साहित्य: उद्‌गम आणि विकास—श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८.
४. रिडल्स मंथन (संपादीत)— पारमिता प्रकाशन, नागपूर, १९८८.
५. क्रांतीप्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर— पारमिता प्रकाशन, १९८८. (आकाशवाणी नागपूर वरून प्रसारित)

डॉ. योगेन्द्र मेश्राम यांनी दलित साहित्याच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली. दलित साहित्य चळवळीमधील एक प्रसिध्द लेखक म्हणून त्यांची ओळख आहे. कथाकार व कादंबरीकार म्हणून परिचित तर आहेच पण त्यासोबत त्यांनी वैचारिक व समीक्षापर ही लेखन केले आहे. तेव्हाच त्यांनी आजही साहित्य क्षेत्राात व इतरही क्षेत्रात आपले स्थान कायम ठेवले आहे.

विशेषत: 'दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते' व क्रांतीप्रेरणा: डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हे प्रसिध्द झालेले दोन ग्रंथ जे त्याच्यामधील एका चिंतनशील विचारवंताचा व समीक्षकाचा परिचय करून देतात. तसेच 'दलित साहित्य: उद्‌गम व विकास' हा शोध ग्रंथ (समीक्षात्मक ग्रंथ) जो सर्वात प्रसिध्दीला आलेला आहे. या शोधग्रंथाद्वारे दलित जीवनाची व दलित साहित्याची (संपूर्ण दलित सृष्टीची) एक वेगळीच 'आयडेन्टिटी' हाती लागली आहे, असे म्हणावे लागेल. हा शोधग्रंथ मराठीमधील एक संग्राहय, मौलिक असा संदर्भ ग्रंथ सिध्द झाला आहे. या ग्रंथाला' शासनाचा पुरस्कार' ही प्राप्त झाला आहे. याशिवाय, 'रक्ताळलेली लक्तरे' या पहिल्याच कथासंग्रहाला (वर्ष—१९८१) मध्ये कथेच्या क्षेत्रात यश प्राप्त झाले व 'राज्यशासनाचा पुरस्कार' ही मिळाला. 'अस्मितादर्श', 'युगवाणी' सारख्या नियकालिकांतून त्यांच्या लेखणाला चांगली चालना मिळत गेली व जिज्ञासापूर्ती वाढत जाऊन सृजनशील मनाचा कलात्मक अविष्कार होत गेला. नव—नव्या ग्रामीण, शहरी, विदर्भातील नागपूरी बोली, वैदर्भिय बोलीभाषा, हिन्दी व मराठी मिश्रीत अशी बोली भाषा ही त्यांच्या [illegible]



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N. P. W. College, Lakhani Distt. Bhandara Ref No. 42

विषय होऊन बसली आहे. वेगवेगळया बोलीभाषेत त्यांच्या कथात्मक शैलीला बहर येऊ लागला त्यामुळे त्यांच्या कथेतील रसात्मकता अधिकच वाढलेली दिसून येते. दलित ग्रामीण व शहरी जीवनातील वास्तवता व दाहकता ज्यामुळे त्यांची कथा ही अधिकच भीषण वाटते.

'जगण्याचा प्रश्न' या प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या कथासंग्रहालाही अधिक बहर आली व यश ही प्राप्त झाले. या उत्कृष्ठ कथासंग्रहाबद्दल सर्व साहित्यिक व समीक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच त्याच्या 'हाहा:कार' ही दिर्घकथा १९९४ साली प्रसिध्द झाली. या कथेच्या उत्कृष्ठ लंखनाबद्दल त्यांना १९९६ चा अस्मितादर्श पुरस्कार ही प्राप्त झालेला आहे. तेव्हापासून 'उत्कृष्ठ कथाकार' म्हणून त्यांची ओळख सर्वांना पटलेली दिसून येते.

विशेषत: आकाशवाणी नागपूर वरून प्रसारित त्यांच्या, कांतीप्रेरणा: 'डॉ. बाबासाहेब आबेंडकर' या वैचारिक लेखणावर विवेनात्मकरित्या मुल्यमापन यावर मुलाखत (संभाषण) प्रदर्शित झालेली आहे. या प्रकारे, डॉ मेश्रामांच्या याहित्याने मराठी साहित्यात अत्यंत मोलाची भर पडली आहे.

विशेषत: डॉ, योगेन्द्र मेश्राम आजही नवनवी साहित्य निर्माण करू पाहत आहेत. त्यांचे सृजनशील मत व जिज्ञासावृत्ती जी आजही तितकीच कायम आहे. त्योच्या उत्कृष्ठ साहीत्याबद्दल डॉ.अ.ना.देशपांडे म्हणतात, ''दलित साहित्याचे अनुकूल—प्रतिकुल असे जे टीकाकार आहेत, त्यांच्या दलित साहित्यावचरील टीकेचे वा आक्षेपांचेही लेखाकाने साधारी खंडण केले आहे आणि प्रस्थापित मराठी समीक्षेचे 'रेडिमेड' जुने निकष बाद ठरवून डॉ. यचोगेन्द्र मेश्रामांनी वाङ्:मयीन समीक्षेच्या नव्या निकषांची वसमीक्षामूल्यांची साहित्य—कृतीच्या प्रकृतीनुसार कशी निकड आहे, हे जोर देऊन सांगितले आहे.

तर डॉ. गंगाधर पानतावणे म्हणातात, डॉ.योगेन्द्र मेश्रामांनी वर्तमानाच्या युगसापेक्ष नव्या दृष्टीकोणातून व जाणीवेतून गतेतिहासाचा अन्वयार्थ जोडून दलित साहित्य विचार हा सामाजिक व सास्कृतिक इतिहासाच्या प्रक्षेपणातून प्रकट केला आहे.'

तर डॉ. भालचंद्र फडके म्हणतात त्याप्रमाणे, ''एका महत्वाच्या विषयासंबंधी केलेले विवेचन व त्यामागील तात्विक भूमिका, लेखकाची वाङ्:मयीन जाण व प्रगल्भ सामाजिक जाणीवा असा दृष्टिकोण डॉ. मेश्रामांच्या साहित्यत दिसून येणे, कौतुकास्पद आहे.''

अशा प्रकारे अनेक साहित्यिकांनी व संशोधकांनी डॉ. मेश्रामांच्या वाङ्:मय संप्रदेचा गौरव केला आहे.

**संदर्भ ग्रथंसूची**

१. डॉ. योगेद्र मेश्राम :— 'दलित साहित्य: उदगम आणि विकास', मंगेश प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९८

२. डॉ. प्रकाश खरात :— 'दलित कथा : उगम आणि विकास', सुगावा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, ऑक्टो. १९९२

Late N. P. W. College, Lakhani, Distt. Bhandara
Ref No.
Dt.